नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०१/२०२६ (शुक्रवार )**

# नागपुर ग्रामीण चे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार यांची निवडश्रेणीत (Selection Grade) पदोन्नती झाल्याबाबत

भारतीय पोलीस सेवेतील सन २०१३ च्या तुकडीतील अधिकारी तथा नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांची निवडश्रेणीत (Selection Grade) पदोन्नती झाल्याबाबत दिनांक २३/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र शासनाने शासन आदेश निर्गमित केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या शासन आदेशानुसार, मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांना दिनांक ०१/०१/२०२६ पासून निवडश्रेणीत (Selection Grade) पदोन्नती देण्यात आली आहे. सदर पदोन्नती ही त्यांच्या विदयमान पदावरच देण्यात आली आहे. **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या पदोन्नतीबद्दल मा. श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा आणि मा. श्री आशिष जैस्वाल, विधानसभा सदस्य, रामटेक तथा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी शुभेच्छा देवुन अभिनंदन केले तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस अधिकारी अंमलदार यांचे कडुन मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.**




## अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, दोन वाहनांसह ६० लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त कुही पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २२/०१/२०२६ रोजी कुही पोलीस रात्री पेट्रोलींग करीत असतांना मौजा उद्री येथे दोन संशयीत वाहने मिळुन आली. टिप्पर क्र एम. एच. ४० सी टी ३३९३ आणि एम.एच ४० बी एल ५४४० या वाहनांची पाहणी केली असता त्यामध्ये रवाडी काळा मुरूम आढळुन आला. **वाहन क्रं १ चा चालक पिन्टु अरूण बावनगडे, वय ३८ वर्षे, रा. आनंदवन, सुरगांव, ता. उमरेड आणि वाहन क्रं २ चा चालक सुनिल ज्ञानेश्वर होले, ५५ वर्षे, रा.डोंगरगांव, ता. कुही** हे मिळुन आले. नमुद चालकांना मुरूम वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं ३) वाहन मालक शाम**

**लालाराम जैस्वाल, वय ५८ वर्षे, रा. नागपुर** याच्या सांगणेवरून अवैधरित्या मुरूमाची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष टाटा टिप्पर क्र एम. एच. ४० सीटी ३३९३ आणि एम.एच ४० बी एल ५४४० दोन्ही वाहने किंमती ६०,००,००० /— रूपये आणि दोन्ही वाहनामधील प्रत्येकी ५ ब्रास मुरूम असा एकुण १० ब्रास मुरूम किंमती १४,०००/— रूपये असा एकुण **६०,१४,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम ३०३(२),४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २२/०१/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,

अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सतर्कतने पेट्रोलींग करीत नवचैतन्य फॉर्म जवळ, चांपा ते सावरमेंढा रोड येथे सोनालिका ट्रॅक्टर क्रं एम एच ४० ए एम ०३०९ त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली या वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता ट्रॉलीमध्ये रेती आढळुन आली. **आरोपी क्रं १ .वाहन चालक चालक रोशन मिनराज कदरे, वय २६ वर्ष ,रा. वार्ड क्र ०१ बाजार चौक, पाटणसांवगी, ता. जि. नागपूर** हा **मिळुन आला.** नमुद आरोपीला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक रमेश पंढरी बोकडे, वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र ०१ बाजार चौक पाटणासांवगी, ता. सावनेर, जि. नागपूर** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष** ट्रॅक्टर क्रं एम एच ४० ए एम ०३०९ त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली **किमती ३,००,००० /—रूपये आणि वाहन क्रं १ ब्रास रेती असा एकुण ३,०२,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम ,कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये  गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रोख रक्कमेसह ८ दुचाकी वाहने असा २ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कोंढाळी :— दिनांक २२/०१/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा तरोडा शिवारात पिएचसी रोड चे समोरील पडीत शेतात काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) असलम मुस्ताक शेख, वय ३९ वर्ष , रा विकास नगर ,कोंढळी ०२) शहजाद मुस्ताक शेख, वय ३५ वर्ष, रा बाजार चौक, कोंढाळी ०३) बलराम हरिसींग चव्हाण, वय ४९ वर्ष, रा. वसंतनगर, कोंढाळी ०४) सुरज मारोती ठाकरे, वय २४ वर्ष, रा. विकास नगर ,कोंढळी ०५) जादु उर्फ शहजाद शाबिर सयद, वय २४ वर्ष, रा विकास नगर ,कोंढळी ०६) अक्षय**

**सुभाषराव मंजुळकर, वय २५ वर्ष ०७) संदिप नामदेवरावजी अहिर, वय ३३ वर्ष , रा विकास नगर ,कोंढळी ०८) प्रविण जयवंतराव भलावि, वय ३२ वर्ष, रा.,खापरी बारोकर ०९) लक्ष्मण योगराज गाखरे, वय ३८ वर्ष रा. खापरी बारोकर १०) वसीम इब्राहिम मुसानी, वय ४१ वर्ष, रा, बुधवारपेठ, कोंढाळी हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.**

आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, रोख रक्कम ११,१०० /— रूपये आणि ०१) मोटर सायकल क्र एम.एच ४० सी एफ ५०६० ०२) मोटर सायकल क्र एम.एच ४० डब्लु २८११ ०३) मोटर सायकल क्र एम.एच ३१ डी एच ४६६० ,०४) मोटर सायकल क्र एम.एच ४० बी झेड ६५९१, ०५) मोटर सायकल क्र एम.एच ४० ए व्ही ५९४१,०६) मोटर सायकल क्र एम.एच ४० एक्स ९६४२ ०७) मोटर सायकल क्र एम.एच ४० डी जी १०२१ ०८) एक मोटर सायकल विना नंबरप्लेट अशा **८ मोटर सायकल असा एकुण २,५१,१०० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांना तात्काळ केले निष्पन्न १२०० किलो दगडी कोळसा जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक २३/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गोपनीय माहीती मिळाली की, कामठी ओसीएम मधुन एका टाटा एस वाहनामध्ये दगडी कोळसा चोरी करून चोरटे हे गाडेघाट—पीपरी रोड ने गेले आहे. अशी माहीती प्राप्त होताच कन्हान पोलीसांनी तात्काळ सदर वाहनाचा शोध घेतला असता गाडेघाट—पीपरी रोडवर शितला माता मंदीर जवळ टाटा एस वाहन क्रमांक एम एच ४० वाय ३००३ हे वाहन दिसले वाहन चालकाने आणि त्याच्या २ साथीदारांनी पोलीसांना बघुन वाहन रोडवर उभे करून पळ काढला. पोलीसांनी शिताफिने एकाला ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता तो विधीसंघर्षग्रस्त बालक होता. पोलीसांनी वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता वाहनामध्ये चोरीचा दगडी कोळसा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा एस वाहन क्रमांक एम एच ४० वाय ३००३ किंमती २,००,०००/— रूपये ज्यामध्ये १२०० कीलो ग्रॅम दगडी कोळसा किंमती ६,०००/— रूपये असा एकूण २,०६,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद गुन्हयात कन्हान पोलीसांनी तात्काळ गुप्त बातमीदार व तांत्रिक पुराव्याचे आधारे आरोपीतांना शोध घेवुन दिनांक २३/०१/२०२६ रोजी आरोपी नामे १) शुभम बिरेंद्र मुखीया, वय २८ वर्षे रा खदान क्रं ६, कन्हान २) विनय ओमप्रकाश कश्यप, वय २७ वर्षे, रा. खदान क्रं ६, कन्हान यांना ताब्यात घेतले. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३०३ (२), ३ (५) भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.**

## पोलीस स्टेशन एम आय डी सी बुटीबोरी अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियाना निमित्य घेण्यात आले जनजागृती कार्यक्रम

पोलीस स्टेशन एम आय डी सी बुटीबोरी अंतर्गत दिनांक २३/०१/२०२६ रोजी रस्ता सुरक्षा अभियाना निमित्य एल ॲड टी कंपनी येथील कंपनी व्यवस्थापक, कामगार यांना तसेच अमर प्राथमिक शाळा उच्च माध्यमिक विद्यालय टाकळघाट येथे भेट देवुन विदयार्थ्यांना प्रभारी अधिकारी सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर, आणि पोलीस स्टेशनचे अंमलदार यांनी वाहतुकीचे नियम, रस्ते सुरक्षा, सायबर क्राईम, डायल ११२, सोशल मीडियाचा सुरक्षीत वापर याबाबत माहीती देवुन मार्गदर्शन करण्यात आले.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने